माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,
शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

ईमेल :-aao.hrms@mahakosh.in संकेत स्थळ :- www.mahakosh.in

क्र/संलेको/११-२०१९/प्रशा-सलेअ-राप/न.क्र.१२३/प्रशा बदली-२०१९/बदली/810 दि. 05 DEC 2019

विषय :- प्रतिनियुक्ती वरुन सेवा प्रत्यावर्तीत केलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांना पदस्थापना देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.१३१/कोषा प्रशा-३, दि.३०/५/२०१५.
३) उपसचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्र.२१६३१/क-१, दि. ३०/११/२०१९.

## आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गातील प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या खालील नमूद अधिकाऱ्यांची सेवा प्रतिनियुक्ती करण्यात आलेल्या कार्यालयाने संदर्भ क्र. ३ वरील आदेशान्वये संचालनालयात प्रत्यावर्तीत केली आहे. यास्तव त्यांना बदलीने इतरत्र पदस्थापना देणे आवश्यक ठरते.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतूदींनुसार व संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील कार्यरत असलेल्या खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. २ मध्ये नमूद अधिकाऱ्यांच्या स्तंभ क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव पदनाम व कार्यरत कार्यालय | बदली करण्यात येत असलेले पद, कार्यालय व ठिकाण | रकाना क्र.३ मधील पद उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. गोपीनाथ गो. कांबळे, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई | सहाय्यक लेखा अधिकारी, पोलिस महासंचालनालय, कुलाबा, मुंबई शहर | श्रीम. ज्योती बाळा कोरगांवकर यांच्या प्रशासकीय बदलीने रिक्त होणाऱ्या पदी |

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे व तसे संचालनालयास अवगत करावे.

संबंधित अधिकाऱ्यांच्या बदलीच्या पदावरील कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यांना रुजू करुन घेण्यासाठी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(ज. र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत अग्रेषित : -
१) अवर सचिव (कोषा प्रशा.३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई.
३) संबधित कर्मचाऱ्यांचे नियुक्तीच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
४) संबंधित कर्मचारी.
५) संबधित कर्मचाऱ्यांची वैयक्तिक नस्ती.
६) निवड नस्ती.